# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २३/०६/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

### मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. उमरेड** :— अंर्तगत नवनित राईस मिल जवळ परसोडी रोड उमरेड येथे दिनांक २१/०६/२२ चे २१.०० वा. ते दि. २२/०६/२२ चे ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नवनीत गोवर्धनदास डागा वय ४३ वर्ष, रा. नवनित राईस मिलजवळ जोगीठानापेठ उमरेड यांनी नेहमी प्रमाणे मोटारसायकल घराचे बाजुला उभी ठेवली होती. त्यानंतर फिर्यादी हे नेहमी प्रमाणे मोटरसायकल घेण्याकरीता गेले असता मोटरसायकल मिळुन आली नाही. त्यानंतर घराचे सिसीटीव्ही फुटेज चेक केले असता दोन अज्ञात आरोपी फिर्यादीचे घरा समोर मोटरसायकलने थांबले त्यापैकी एक ईसम फिर्यादीचे गाडी जवळ येवुन गाडीचा नंबर प्लेट काढुन गाडी घेवुन जातांना दिसले. त्यांनी गाडी कोणत्या दिशेने घेवुन गेले काही माहित नाही. आजुबाजु उमरेड परिसरात शोध घेतला परंतु मिळुन आली नाही. अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे एम.एच— ४०/ए.जे—२२२१ क्रमांकाची रॉयल एन्फिल्ड बुलेट गाडी ऐश रंगाची किंमत १,०५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार आशिष खोडे मो.नं. ९४२३६०५०७१ हे करीत आहे.

### ट्रक चोरी

**पो.स्टे. मौदा** :— फिर्यादी नामे— सचिन प्रभाकर ठाकरे वय ३५ वर्ष, रा. कापसी ता. कामठी यांनी दि २१/०६/२०२२ रोजी पहाटे ०५.३० वा. त्यांचे एमएच— ४०/बीएल— २१८२ क्रमांकाचा अशोक लेलॅन्ड ०६ चक्का ट्रकमध्ये हल्दीराम कंपनी येथुन कंपनीचा माल भरुन गोंदीया येथे खाली करण्यासाठी सुनिल रहीमतकर याच्या सोबत निघाले व दुपारी १२.३० वा. गोंदीया येथे हल्दीराम कंपनीचा माल खाली करुन फिर्यादीचे गावी कापसी येथे येण्यासाठी मौदा मार्गे निघाले. त्यादरम्यान त्यांना उशीर झाल्याने ते रात्री ११.०० वा. कलकत्ता ढाब्यासमोर उमरी शिवार येथे आपला ट्रक थांबवुन समोर लावुन जेवन करण्यासाठी फिर्यादी व त्यांचा ड्रायव्हर ढाब्यावर गेले तेथे जेवण करुन मध्यरात्री १२.०० वा. जेवण केलेल्या जागेवर गेले असता ट्रक दिसला नाही. दि २१/०६/२२ रोजी रात्री २३/०० वा. ते २३/१५ वा. सुमारास अज्ञात आरोपीने फिर्यादीचा ब्राउन रंगाचा अशोक लेलॅन्ड ६ चक्का ट्रक कि. १०,००,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोनेकर हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. कन्हान** :– अंर्तगत ०१ कि.मी. अंतरावरील जय भोले रेस्टोरेन्ट चा बाजुला तारसा चौक कन्हान येथे दिनांक २०/०६/२०२२ चे १३.१५ ते १३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– मोहम्मद सग्गीर शरीफ अंसारी वय ३८ वर्ष, रा. टेकाडी कॉलनी कन्हान हे तारसा चौक कन्हान येथे त्यांच्या ओळखीच्या महिलेची स्कुटी दुरूस्त करीत असतांना आरोपी नामे– अवतारसिंग सनो़त्रा वय ४५ वर्ष, रा. टेकाडी कॉलनी कन्हान यांनी तारसा चौक येथे येवुन जुण्या कारणाच्या वादावरून फिर्यादीला शिवीगाळ करून फिर्यादीच्या डाव्या हाताच्या मनगटाला हातानी मारहाण करून जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीला जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेके मो.क्र. ९२८४२६२५९६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**